सूचना : 1. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

S.Y.B.A Sem III
Marathi III

प्र. १ अ) मानवी भाषेची लक्षणे सविस्तर लिहा. २०

किंवा

आ) भाषेकडून साधल्या जाणाऱ्या विविध कार्यांचा आढावा घ्या.

प्र. २ अ) सपीर आणि वोर्फ यांच्या भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत विशद करा. २०

किंवा

आ) संस्कृती म्हणजे काय ते सांगून भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

प्र. ३ अ) प्रमाणभाषा आणि बोली यांचा परस्परसंबंध स्पष्ट करून मराठीच्या बोलींची थोडक्यात चर्चा करा २०

किंवा

आ) बोलीच्या अभ्यासाच्या स्वरूपाचे विवेचन करून बोलीच्या अभ्यासाच्या साधनांचा परामर्श घ्या.

प्र. ४) खालीलपैकी प्रत्येक गटातील कोणतीही एक टीपा लिहा. ३०

अ) १) भाषेच्या संकल्पना

किंवा

२) मानवी संप्रेषणाचे स्वरूप

ब) १) जागतिकीकरण आणि भाषा

किंवा

२) भाषिक ऱ्हासाची कारणे

क) १) बोलीच्या अभ्यासाची गरज

किंवा

२) कोकणी बोलीची वैशिष्टये

प्र. ५) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१) मानवी संप्रेषणाचे वेगळेपण स्पष्ट करणारी भाषेची दोन लक्षणे सांगा
२) मानवी भाषेची व्याख्या लिहा.
३) रोमान याकोबसन प्रणीत कोणतीही दोन भाषिक कार्ये लिहा.
४) भाषिक बहुजिनसीपणा म्हणजे काय?
५) भाषिक नियोजन ही संकल्पना स्पष्ट करा.
६) भाषिक ध्रुवीकरणाचे धोके कोणते?
७) प्रमाणभाषेची दोन वापरक्षेत्रे लिहा.
८) कोणत्या जिल्ह्यामध्ये अहिराणी बोली बोलली जाते?
९) बोलीच्या अभ्यासाची दोन साधने सांगा.